सं. फौ. ख. क्र.२९/२०२४

**नि. क्र. ३२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची साक्ष</u> –**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**
माझे नाव : विदिता गणेश झगडे,
वय सुमारे : ३९ वर्षे, धंदा – गृहीणी,
राहणार : ओट्रा रेसिडन्सी, खर्येवाडी, ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग
-----------------------------------------

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती गोबाडे यांचे मार्फत –</u>**

**१.** दिनांक २१.०१.२०२४ रोजी मुंबई–गोवा महामार्गावर, ओट्रा रेसिडन्सी जवळ सकाळी ११.३० ते १२.०० च्या सुमारास घटना घडली. त्यादिवशी मी व माझे पती बुलेट मोटरसायकलवरुन घरातील गॅस सिलेंडर भरुन आणण्यासाठी ओरोस फाट्यावर गेलो होतो. तेथून ओरोस फाट्यावर राहत असलेले आमचे नातेवाईक सचिन ओटवणेकर यांचे घरी गेलो. तेथे थोडावेळ बसलो, नंतर आम्ही सिलेंडर घेऊन आमच्या घरी जाण्यासाठी निघालो. ती बुलेट माझे पती गणेश झगडे चालवित होते. त्यावेळी ओट्रा रेसिडन्सीजवळ विरुध्द बाजूने एक दुचाकी गाडी येत होती. आम्ही तिला साईड देण्यासाठी बाजूला झालो, तेव्हा पाठीमागून येणाऱ्या ट्रकने आम्हाला धडक दिली. त्या धडकेमुळे मी पडले. माझ्या पतीच्या उजव्या पायाला दुखापत झाली, डाव्या पायाला मुकामार लागला व मी बेशुध्द पडले. मला उपचारासाठी सुरुवातीला एस.एस.पी.एम. हॉस्पीटलला नेले व पुढील उपचारासाठी गोवा मेडीकल कॉलेज/हॉस्पीटल, बांबूळी येथे नेले. मला दिनांक २१.०१.२०२४ रोजी गोवा मेडीकल कॉलेज/हॉस्पीटल, बांबूळी येथे उपचाराकरीता ॲडमिट केले व दिनांक ०७.०२.२०२४ रोजी मला डिस्चार्ज मिळाला. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. सदर ट्रक ड्रायव्हरचे नाव सच्चिदानंद सायबान म्हात्रे असल्याचे व त्या ट्रकचा नंबर

एम.एच. ०९ सी.व्ही. ३३३५ असा होता असे मला समजले. त्या अपघातामध्ये माझ्या बरगड्या मोडल्या होत्या, दोन्ही मांड्यांचे हाड मोडले होते व डाव्या पायाला दुखापत होवून टाके पडले होते.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री.ए.ए.शेख यांचे मार्फत–**

२. हे म्हणणे खरे आहे की, ओट्रा रेसिडन्सीसमोर मुंबई गोवा हायवे असून तेथे नेहमी वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रेसिडन्सीमध्ये बरेचशे फ्लॅट असून तेथे अनेक लोक राहतात. हे म्हणणे खरे आहे की, ओट्रा रेसिडन्सीसमोर हायवेवर अपघात झाल्यास सदर रेसिडन्सीमधील फ्लॅटमध्ये ऐकू येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रेसिडन्सीसमोर असणारी लेन ही मुंबईकडे जाणारी आहे व रस्ता दुभाजकाच्या पलीकडे असणारी लेन गोव्याकडे जाणारी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रेसिडन्सीच्या समोर मुंबई लेनमधून गोवा लेनमध्ये जाण्यासाठी मार्गिका/जागा नाही.

३. माझे पती एस.एस.पी.एम. हॉस्पीटलमध्ये ५ वर्षापासून कामाला आहेत. ते हॉस्पीटल खासदार नारायण राणे यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेल्या घटनेदिवशी माझे पती बुलेट चालवत होते व मी मागे बसलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दोघांच्यामध्ये गॅस भरलेली सिलेंडरची टाकी होती. हे म्हणणे खरे आहे की, इतर दुचार्कीपेक्षा बुलेट ही अधिक जड असते. हे म्हणणे खरे आहे की, मी म्हणत असलेल्या घटनेवेळी एक दुचाकीस्वार रॉग साईडने आला. हे म्हणणे खरे

आहे की, सदर दुचाकीस्वाराला वाट देण्याकरीता माझ्या पतीने बुलेट रस्त्याच्या खाली साईड पट्टीवर उतरवली. हे म्हणणे खरे नाही की, रस्ता उतरल्याने मागे असणारी गॅसची टाकी डळमळीत झाली व त्यामुळे आमची गाडी पडली. हे म्हणणे खरे नाही की, आमची गाडी स्वत:हून पडल्यामुळे मला व माझ्या पतीला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघाताशी आरोपीचा व आरोपीच्या वाहनाचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिनांक २१.०१.२०२४ ते ०७.०२.२०२४ या कालावधीत उपचार घेतलेबाबतचे कागद तपासी अंमलदारांना दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझया सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पतीची फिर्याद टिकावी म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास –** नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
**( ए.जी.देशिंगकर )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग–ओरोस.

ठिकाण :– ओरोस
दिनांक :– १८/०५/२०२६.